# चैत्र शुध्द गुढिपाडवा - श्री शालिवाहन शके १९४२

**- ज्योति जोशी** (बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स)



## हेही दिवस सरतील !

करोनाच्या जबरदस्त विळख्यात
अवनी सारी गुदमरतेय
सारीकडे हाहांकार माजलाय
तरीही आज चैत्र शुध्द गुढिपाडवा
तुम्हाला हाकांरताना माझ्या मनाची
गुढी उंचावली आहे
'सुआरोग्यसुखसंपत्ती तुम्हाला लाभो'
या टाळ्या मी वाजवतेय तुम्हासाठी
पहाटेपहाटे लाल चुटूक कार्डीनल पक्षाची
गोड शीळ कानी पडली
अंगणातला फोरसिथीया सूर्यकिरणानी
पिवळा धम्मक फुलला
जांभळी क्रोकसेस गोठलेल्या
जमिनीतून डोकावली
धरणीमाय हिरव्या मखमली साखरझोपेतूंन
जागी झाली
Rebirth is happening
आसमंतांत एकच एक आरोळी घुमतेय...
हेही दिवस सरतील हेही दिवस सरतील !
We shall overcome!

***